**राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतन त्रुटी निवारण समितीची स्थापना.**

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- वेपुर १२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ मे २००९.

वाचा :- शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक : वेपुर-१२०९/प्र.क्र. २७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल २००९.

**शासन निर्णय :-** सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेच्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना उपरोक्त दिनांक २२ एप्रिल, २००९ च्या शासन अधिसूचनेन्वये दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतन संरचना विहित करण्यात आली आहे. या सुधारित वेतन संरचनेमध्ये काही त्रुटी राहण्याची शक्यता लक्षात घेवून, त्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विहित करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमधील त्रुटींचे निवारण करुन, त्यांना सुधारित वेतन संरचनेची शिफारस करण्याकरीता पुढीलप्रमाणे वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग | सदस्य |

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

(अ) राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशींच्या अनुषंगाने विहित केलेल्या सुधारित वेतनसंरचनेमधील त्रुटींचे परीक्षण करुन योग्य सुधारित वेतन संरचनेची शिफारस करणे.

(ब) मा.मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाने निर्णय घेवून समितीकडे सोपविलेल्या विनिर्दिष्ट प्रस्तावांबाबत शिफारस करणे.

४. एखादया विशिष्ट संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आहे, असे प्रशासकीय विभागाच्या सचिवांना / विभाग प्रमुखांना ज्या प्रकरणी वाटेल, ती प्रकरणे त्यांनी केंद्र शासनाकडील समतुल्य पद, त्याची सुधारणापूर्व वेतनश्रेणी आणि सुधारित वेतन संरचना, सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन तपासावित व तपासणीअंती अशा प्रकरणांमध्ये त्रुटी आहे अशी त्यांची खातरजमा झाल्यास, त्यासंबंधीचे प्रस्ताव ४ प्रतींसह समितीकडे आवश्यक त्या समर्थनासह हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत पाठवावे.

५. कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त संघटनेस / महासंघास काही संवर्गाच्या त्रुटीबाबत निवेदने सादर करावयाची असल्यास, ती संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सादर करावीत. प्रशासकीय विभागाने या निवेदनांची तपासणी करुन वरील अ.क्र.४ मध्ये नमुद केल्यानुसार आपल्या शिफारशीसह प्रस्ताव समितीच्या विचारार्थ सादर करावेत.

६. समिती आपल्या कामासाठी स्वतःची कार्यपध्दती ठरवील आणि नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०५२१११५२३४००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

विद्याधर कानडे

**( विद्याधर कानडे )**
**प्रधान सचिव (वित्त)**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मा.मंत्री आणि मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला

# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,मंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई /पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, जि. नागपूर
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

# पत्राने.

-----------